**सार्वजनिक बांधकाम विभागातील कंत्राटदाराची निविदा भरण्याची क्षमता (Bid Capacity) व कंत्राटदारातर्फे कामावर नियुक्त करण्यात येणारे तांत्रिक प्रशिक्षित मनुष्यबळाचा तपशिल निविदा भरतांना उपलब्ध करण्याकरीता संगणकीय प्रणालीचा वापर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५४/इमारती-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०७/१२/२०२३

**वाचा** :- १) शासन निर्णय क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.०८/इमारती-२,दि.२७/०९/२०१८
२) शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०१९/प्र.क्र.१२०/इमारती-२,दि.१७/०९/२०१९
३) शासन निर्णय क्र.सीएटी-२०२२/प्र.क्र.५०/इमारती-२,दि.११/०५/२०२२

**प्रस्तावना** :-

सद्य:स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागातील निविदा प्रक्रियेअंतर्गत कंत्राटदारातर्फे निविदा सादर करताना निविदा भरण्याची क्षमता (Bid Capacity) संदर्भात माहिती सादर करणे अनिवार्य आहे. तसेच शासन स्तरावरुन निर्गमित विविध शासन निर्णय/ परिपत्रकाव्दारे कंत्राटदाराची निविदा भरण्याची क्षमता (Bid Capacity) तपासण्याबाबत कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. संदर्भिय शासन निर्णय क्र.३ अन्वये रू.३० लक्ष किंमतीच्या वरील सर्व कामांसाठी Bid Capacity ची अट लागू करण्याबाबत व एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी Bid Capacity ची अट लागू करण्यात आली आहे. हया सुचनांनुसार निविदा सादर करतांना कंत्राटदाराने सादर केलेल्या माहितीच्या आधारे विभागातर्फे Bid Capacity प्रत्येक निविदेच्या वेळी तपासण्यात येते.

सद्य:स्थितीत कंत्राटदारातर्फे निविदेसोबत सादर केलेल्या दस्तऐवजाच्या आधारे Bid Capacity परिगणित करुन कंत्राटदाराना कामे देण्यात येत आहेत. सदर कार्यपद्धतीनुसार Bid Capacity ची तपासणी करीत असताना कंत्राटदाराने दिलेल्या माहितीची खातरजमा करण्यात अडचणी व विलंब होत असल्याचे निदर्शनास आले असून काही वेळा या संदर्भात तक्रारीही उपस्थित होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या व्यतिरिक्त कामांचे कार्यान्वयन करतांना कंत्राटदारातर्फे कामावर देखरेख ठेवण्याकरीता प्रशिक्षित अनुभवी तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करणे बंधनकारक आहे. त्यानुसार कामाची निविदा भरतांना कंत्राटदारातर्फे त्यांचेकडे उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाची माहिती देण्यात येते. कंत्राटदारातर्फे बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यात देखरेख उत्तमरितीने व्हावी व सा. बां. विभागातील पर्यवेक्षकीय अभियंता यांना बांधकामाच्या प्रत्येक टप्प्याबाबत कंत्राटदारातर्फे नियुक्त अभियंता यांचे मध्ये नियमित समन्वय होण्याच्या दृष्टीने कामाची निविदा सादर करतांना कंत्राटदाराकडे उपलब्ध मनुष्यबळाचा तपशील सा. बां. विभागास संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रमाणित करुन निविदेसोबत अपलोड करण्याचे विचाराधीन होते. हया दोन्ही प्रक्रिया अधिक पारदर्शक तथा सुलभ तसेच प्रभावी करण्याचा मतप्रवाह बऱ्याच कालावधीपासून व्यक्त करण्यात येत होता. त्यानुषंगाने प्रचलित पद्धतीने कालापव्यय टाळण्याच्या दृष्टीने निविदा निकोप स्पर्धात्मक होण्याकरीता निविदा प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने तसेच कामाची गुणवत्ता उत्तम दर्जाची राखली जाईल या हेतूने Web based Bid Capacity

& Technical Manpower प्रणाली विकसित करुन कंत्राटदारांची निविदा क्षमता व कामाच्या गुणवत्तेवर नियंत्रणाच्या दृष्टीने ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणाली करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

१) सार्वजनिक बांधकाम विभागातील कंत्राटदारांची निविदा भरण्याची क्षमता ऑनलाईन पध्दतीने तयार करण्याकरीता Bid Capacity & Technical Manpower संगणक कार्यप्रणाली विकसित केलेली आहे. सदर ऑनलाईन संगणक प्रणाली www.mahapwd.gov.in हया सा. बां. विभागाच्या संकेतस्थळावर "bidcap.emahapwd.com" या Link व्दारे उपलब्ध आहे. शासन निर्णय दि. ११/५/२०२२ अन्वये रू.३० लक्ष किंमतीवरील सर्व कामांकरीता तसेच ज्या कंत्राटदाराने एका वित्तीयवर्षात ३ कामे रु.३० लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक किंमतीची कामे घेतली आहे, अशा कंत्राटदारांना त्या वित्तीय वर्षात कामे घ्यावयाची असल्यास सा. बां. विभागात निविदा भरताना Bid Capacity & Technical Manpower हया Web Based संगणक प्रणालीचा वापर करुन Bid Capacity व Technical Manpower Deployment प्रमाणपत्र, निविदा सादर करतांना अपलोड करणे अनिवार्य राहील.

२) शासन निर्णय दि.११/५/२०२२ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार सा. बां. विभागात काम करणारे कंत्राटदार हयांना रू. ३० लक्ष वरील सर्व प्रकारच्या कामांच्या निविदाकरीता संगणकीय कार्यप्रणालीमधून Bid Capacity व Technical Manpower Deployment प्रमाणपत्र सादर करणे हया अटी लागू राहतील. तसेच सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्था हयांना सर्वसाधारण निविदा प्रक्रियेत भाग घेत असल्यास वरील सर्व अटी त्यांनाही लागू राहतील.

३) या संगणकीय प्रणाली अंतर्गत निविदेमध्ये समाविष्ट अटीमध्ये नमूद केल्यानुसार Assessed Bid Capacity परिगणित करण्याचे सुत्र (Available Bid Capacity) खालील प्रमाणे राहील.

A- Maximum Value of Civil Engineering work executed in anyone year during last **<u>five years</u>** taking into account the completed as well as ongoing work.

N = Number of years prescribed for completion of the works for which bids are invited.

B= Value of existing Committments & ongoing works in hand (During period of work under consideration)

४) याकरीता कंत्राटदाराने A आणि च्या पृष्टयर्थ सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार त्यांचेकडे असलेल्या कामांची माहिती, सर्व कामांचे Work done प्रमाणपत्र, वार्षिक उलाढाल (Turnover) दर्शविणारे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेली कागदपत्रे, Yearly Tax Credit Statement - "Form 26 A", CIBIL SCORE, इत्यादी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

५) Bid Capacity संगणकीय प्रणालीचा वापर करुन Bid Capacity प्रमाणपत्र कंत्राटदाराने प्रत्येक निविदेसोबत Upload करायचे आहे. विभागातील निविदा भरलेल्या कंत्राटदाराची Bid Capacity तपासतांना संबंधित कार्यकारी अभियंता यांना या संगणकीय प्रणालीव्दारेच कंत्राटदाराकडे प्रगतीत असलेली कामे (GST R ७ मधील तपशीलावरुन) कंत्राटदाराची निम्नतम देकार देण्यात आलेली कामे, कार्यारंभ आदेश देण्यात आलेली कामे तपासणीकरीता उपलब्ध होणार आहेत. कार्यकारी अभियंता यांना विभागातील कामाकरीता निविदा भरलेल्या कंत्राटदाराची Bid Capacity तपासतांना कंत्राटदाराकडे असलेली कामे, निम्नतम देकार देण्यात आलेली कामे इत्यादी वजा जाता पर्याप्त Bid Capacity असल्यास सदर निविदेच्या तांत्रिक लिफाफा प्रकरणी त्वरीत निर्णय घेऊन पुढील प्रक्रिया हाती घ्यायची आहे. परंतु कंत्राटदाराकडे असलेली कामे, निम्नतम देकार देण्यात आलेली

कामे विचारात घेता विभागाकडे निविदा भरलेले कामाकरीता Bid Capacity पर्याप्त नसल्यास इतर विभागातील L1 Bidder असलेल्या कामाबाबत त्या विभागाशी संपर्क साधून पुढील कार्यवाही/निर्णय घेणे आवश्यक आहे.

६) सर्व सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे वस्तू व सेवा कर विभागास कंत्राटदारनिहाय GST विवरण दरमहा जमा करणे अनिवार्य असल्याने प्रायोगिक तत्वावर विभागातील सर्व कंत्राटदारांना अदा केलेल्या भुगतानानुसार वस्तू व सेवा कर विवरण Annexure R-GST Generation करिता Option हया संगणकीय प्रणालीत देण्यात येत आहे. हया प्रणालीचा वापर करून सर्व विभागांनी Annexure R-GST वस्तू व सेवा कर विभागास पाठविणे बंधनकारक राहील.

७) Joint Venture निविदाकाराने भरावयाचा तपशील स्वतंत्रपणे हया संगणकीय प्रणालीत कामनिहाय Joint Venture भागीदारीनिहाय (Joint Venture) भरावयाचा आहे. हयाबाबत संगणकीय प्रणालीच्या आज्ञावली नियमपुस्तिकेत दिलेल्या सुचनांनुसार तपशील भरून Joint venture बाबत Bid capacity प्रमाणपत्र काढण्याची सुविधा देण्यात आली आहे.

८) कंत्राटदारातर्फे बांधकामाची निविदा भरताना त्याचेतर्फे उपलब्ध करणारे मनुष्यबळाचा तपशील परिशिष्ट ब मध्ये नमूद केल्यानुसार संगणकीय प्रणालीमध्ये भरणे अनिवार्य आहे.

९) बांधकामाची गुणवत्ता उत्तम व्हावी व कामाच्या देखरेख गुणवत्तेबाबत निर्णय वेळेत व्हावे, या दृष्टीने कंत्राटदारातर्फे उपलब्ध मनुष्यबळाचा तपशील संगणकीय प्रणालीवर भरतांना खालील बाबी विचारात घ्यावयाच्या आहेत.

९.१) कंत्राटदाराने त्याचेकडे उपलब्ध असलेला संपूर्ण Key Personal & Technical Staff चे details संगणकीय प्रणालीमध्ये भरावयाचे आहेत. ही माहिती प्रथमत: संपूर्णपणे भरल्यानंतर कंत्राटदारास केवळ त्यात काही बदल झालेले असल्यास त्यानुसार भरावे लागतील. यास्तव ही माहिती वारंवार भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

९.२) मुद्दा क्र. ९.१ मध्ये माहिती भरल्यानंतर कंत्राटदाराने त्याचेकडे उपलब्ध असलेल्या संपूर्ण Key Personal & Technical Staff मधून ज्या कामाची निविदा सादर करीत आहे, त्यासाठी निविदेतील शर्तीनुसार आवश्यक तो Staff Dropdown Menu च्या सहाय्याने निवडण्यासाठी संगणकीय प्रणालीमध्ये उपलब्ध करण्यात येत आहे.

९.३) कंत्राटदाराची निविदा निम्नतम देकाराची ठरल्यास निविदा मंजूरी प्रक्रियेअंती कामाची सुरक्षा ठेव रक्कम जमा करण्यास ई-मेल कळविण्यात येईल. कंत्राटदाराने सुरक्षा ठेव रक्कम जमा केल्यावर कामावर नियुक्त केलेले मनुष्यबळाबाबत तपशील कार्यारंभ आदेशासोबत उपलब्ध करण्यात येईल.

९.४) सा.बां.विभागात कामे कार्यान्वीत करणा-या कंत्राटदारांकडे बांधकामाच्या कार्यान्वयनाकरीता अनुभव व अनुभवी तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असणे, ही अनिवार्य अर्हता (Mandatory Technical Qualification) आहे. त्यामुळे कंत्राटदारातर्फे बांधकामाच्या कार्यान्वयनाकरीता अनुभवी तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करण्याबाबत विभागाविरूध्द कुठल्याही स्वरूपाचे दावे/नुकसान भरपाई मागणार नाही, याबाबत रू. ५००/- च्या Stamp Paper वर प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

९.५) सदर संगणकीय प्रणालीद्वारे कंत्राटदारातर्फे भरण्यात येणारा तपशील e-Registration प्रणालीच्या तपशीलासोबत पडताळण्यात येणार आहे. कंत्राटदारातर्फे खोटी माहिती भरल्याचे आढळल्यास शासन निर्णय क्र. सीएटी २०१८/प्र.क्र.१२७/इमा-२, दि.२८ नोव्हेंबर २०१८ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१०) ही प्रणाली कंत्राटदार, सुशिक्षीत बेराजगार अभियंता, निविदा प्रक्रिये अंतर्गत भाग घेणारे इत्यादी करीता प्रथमत: नि:शुल्क असेल. त्यानंतर शासनाच्या धोरणानुसार हया प्रणालीत वापराकरीता शुल्काबाबत विचार करण्यात येईल.

११) सदर कार्यप्रणाली अंतर्गत, कंत्राटदार (अर्जदार) लॉगीनद्वारे स्वयंघोषित माहिती ऑनलाईनद्वारे सादर करतील. सर्व माहिती भरल्यानंतर कंत्राटदार त्यांचे QR based Bid Capacity व Technical Manpower Deployment

प्रपत्र हे सदर प्रणालीद्वारे Generate करतील. सदर Digitised Certificate कंत्राटादारास त्याच्या Login मध्ये उपलब्ध असेल.

१२) सदर शासन निर्णय प्रसिध्दीच्या दिनांकापासून सा. बां. विभागाच्या प्रत्येक निविदा अंतर्गत तांत्रिक लिफाफा मध्ये QR based Bid Capacity व Technical Manpower Deployment प्रमाणपत्र हे अनिवार्य असेल. सर्व संबंधितानी या अनुषंगाने निविदा मसुदा प्रपत्रातील Qualification criteria मध्ये व इतर आवश्यक अनुषंगिक बदल करावेत.

१३) निविदा उघडताना सक्षम प्राधिकारी कंत्राटदाराचे QR based Bid Capacity व Technical Manpower Deployment प्रमाणपत्र त्याने जोडलेल्या दस्तऐवजाच्या आधारे छाननी करतील. त्या अंतर्गत सक्षम प्राधिकारी हे आपल्या Login व्दारे निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता तपासतील. या प्रक्रियेमध्ये निविदा उघडणाऱ्या सक्षम प्राधिकरणाचा निर्णय हा अंतिम राहील आणि सर्वांस बंधनकारक राहील.

१४) सदर Bid Capacity व Technical Man power Deployment प्रणाली अंतर्गत खालील प्रमाणे विविध Logins राहतील.

अ) कंत्राटदार, सुशिक्षीत बेराजगार अभियंता, मजूर सहकारी संस्था व इतर निविदा प्रक्रियेत भाग घेणारे निविदाकार

ब) सक्षम प्राधिकारी (कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता इत्यादी)

क) Login चे बाबत Administrative Rights ITCC, नागपूर हयांचे राहतील.

१५) सदरहू संगणकीय कार्यप्रणाली मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या अधिपत्याखाली नागपूर येथील माहिती व तंत्रज्ञान समन्वय केंद्र (आयटीसीसी) मध्ये विकसित करण्यात आलेली असून सा. बां. प्रादेशिक विभाग, नागपूर हे प्रमुख समन्वयक व अवर सचिव (इमा.) हे सह-समन्वयक राहतील

१६) Bid Capacity व Technical Man power Deployment प्रणाली अंतर्गत संगणक प्रणालीचे देखभाल, हार्डवेअर/सर्व्हर, विविध टप्पे विकसित करणे इ. बाबतचे खर्च हे कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग क्र.२, नागपूर यांचेकडे e-ROC अंतर्गत उपलब्ध निधीद्वारे करावा.

१७) Bid Capacity व Technical Man power Deployment प्रणाली अंतर्गत कुठलेही वादविवाद अथवा तंटाभांडणे उद्भवल्यास संबंधीत मुख्य अभियंता यांच्याअधिकार क्षेत्रात हाताळण्यात येतील. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आला असून सांकेतांक क्रमांक २०२३१२०७१३१५१४७७१८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने, SACHIN MANIKRAO CHIVATE

Digitally signed by SACHIN MANIKRAO CHIVATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT, 2.5.4.20=e51dff58ad80dfdae3976edee46d1bf7934d01469cb4d916976c25305666b613, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=40AE84322C80D3E4EA1B574EB3782ED6CB133B938933BDF197ED5A1551D8622A, cn=SACHIN MANIKRAO CHIVATE
Date: 2023.12.07 14:35:02 +05'30'

**( सचिन चिवटे )**

**अवर सचिव ( इमारती )**

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई

२. मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,

५. सार्वजनिक बांधकाम विभाग/वित्त विभाग/ग्राम विकास विभाग

६. महालेखापाल - १, मुंबई

७. महालेखापाल २, नागपूर

८. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई/नागपूर

९.महासंचालक, माहिती व प्रसिध्दी महासंचालनालय, मुंबई यांना प्रसिध्दीसाठी

**प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-**

१०. सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, (विद्युतसह)

११. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई

१२. संचालक, उद्याने व उपवने, मुंबई

१३. सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग, (विद्युत/यांत्रिकी)

१४.अधीक्षक अभियंता यांनी आपल्या अधिनस्त कार्यालयांना सदर शासननिर्णयाची प्रत अग्रेषित करावी.

१५. मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई

१६. सर्व सहसचिव/उपसचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, सा.बां.वि., मंत्रालय, मुंबई

१७. कार्यासन इमारती -२ (निवड नस्ती)

## परिशिष्ट-अ

### Turnover Details as per Chartered Accountant Certificate (Last 5 years)

| Sr. No. | Year | Turn Over | Updated Turn over with factor | Remark |
|---|---|---|---|---|
| 1. | 2018-19 | | | |
| 2. | 2019-20 | | | |
| 3. | 2020-21 | | | |
| 4. | 2021-22 | | | |
| 5. | 2022-23 | | | |

**Note :-** Bidder shall upload CA certificate regarding annual turnover.

### Work Done Details (Last 5 Years)

| Sr. No | Dept Name | Name of Work | Date of Work order | Time period of work | cost of work | UptodateYearwise Expenditure / Work Done | | | | | Balance cost | upload work order |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | | |
| 1 | | | | | | 18-19 | 19-20 | 20-21 | 21-22 | 22-23 | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

**Note :-** Bidder shall upload work done certificate of Engineer –in –Charge in Support.

# परिशिष्ट-ब

**(List of Key personnel to be deployed on contract work)**

| Sr. No. | Personnel | Qualification | |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |

**Note :-**Bidder shall submit the name and C.V. s of above personnel with all details in field given in software .